International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.1 September – October 2022

# प्राध्यापकांच्या संशोधन कार्यामध्ये ग्रंथालयाचे योगदान

**प्रा. विजय आर. गायकवाड**
ग्रंथपाल, स्व पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, रिसोड.
*Corresponding Author - प्रा. विजय आर. गायकवाड*
**Email -** gaikwadvijay.209@gmail.com
**DOI - 10.5281/zenodo.7223534**

**प्रस्तावना:**

सध्या सगळीकडेच माहिती साधनांमध्ये कमालीचे वैविध्य आलेले आहे. माहितीचा शोध, माहिती प्रतिपाती, विश्लेषण, जतन आणि संप्रेषण ही कौशल्य धारण करणे किती आवश्यक आहे याची जाणीव प्रत्येकास होत आहे. व विद्यार्थ्यांना नवीन माहिती उपलब्ध करून देण्यासाठी प्राध्यापकांनी सुद्धा संशोधन करणे काळाची गरज आहे. जगात दर पाच मिनिटाला नवीन शोध लागत आहेत या शोधाची माहिती इंटरनेटच्या माध्यमातून आपल्याला उपलब्ध होत आहे. व हीच माहिती प्राध्यापक संशोधकाकडून विद्यार्थ्यास देणे म्हणजेच माहितीची देवाणघेवाण करणे सुलभ होत आहे. प्राध्यापकाच्या संशोधन कार्यासाठी ग्रंथालयाची फार मोठी भूमिका आहे. ग्रंथालयाशिवाय प्राध्यापकांचे संशोधन कार्य पूर्ण होणे अशक्य आहे. म्हणून ग्रंथालय वेगवेगळ्या माहिती तंत्रज्ञानाच्या उपक्रमातून संशोधक प्राध्यापकांना आकर्षित करत आहेत. संपूर्ण ग्रंथालय ही महत्त्वाची माहिती केंद्र बनली आहेत व याचाच उपयोग प्राध्यापकांना संशोधनासाठी होऊन हेच प्राध्यापक विद्यार्थ्यांना नवनवीन माहिती देत आहेत. व त्यासाठीच ग्रंथालय व ग्रंथपाल हे जास्तीत जास्त आधुनिक सेवा कशी देता येईल याकडे लक्ष देत आहेत.

**प्राध्यापक:**

विद्यार्थी अध्ययन ज्ञानार्जन करतात व प्राध्यापक अध्यापनाचे कार्य करतात म्हणजेच शिकवितात.

**संशोधन:**

संशोधन म्हणजे ज्ञानप्राप्तीसाठी घेतलेला शोध होय. प्राध्यापकांना संशोधन करण्यासाठी पुस्तके संदर्भ ग्रंथ नियतकालिके तसेच वेगवेगळी माहिती तंत्रज्ञान यावर आधारित माहिती यांचा आधार घ्यावा लागतो तसेच माहिती एकत्रित करून नवीन लिखाण करावे लागते. उच्च शिक्षणामध्ये तर संशोधनास फार महत्त्व आहे. शिक्षण जशी निरंतर चालणारी प्रक्रिया आहे तसेच संशोधन प्रक्रिया सुद्धा चालूच असते. एखाद्या समस्येच्या निराकरणासाठी संशोधनातून मार्ग काढावा लागतो व त्यानंतर त्यातील उनिवा दूर केल्या जातात. प्राध्यापक नियुक्तीसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने आचार्य ही पदवी सगळ्यांना लागू केली आहे. थोडक्यात संशोधनाशिवाय प्राध्यापकांच्या ज्ञानामध्ये भर पडू शकत नाही व विद्यार्थ्यांनाही त्याशिवाय ते वेगवेगळी माहिती देऊ शकत नाहीत.

**संशोधनाचे महत्त्व:**

पुस्तकांची जागा आता माहिती तंत्रज्ञान साधनांनी घेतली आहे जगातील कोणतीही माहिती ही ताबडतोब डाउनलोड करून प्रिंट काढता येते अशावेळी प्राध्यापकांना संशोधनासाठी केवळ साधने असून चालत नाहीत तर ते हाताळण्याचे प्रशिक्षण सुद्धा आवश्यक आहे शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया असल्यामुळे डिजिटल बोर्ड किंवा संस्कृती यांनी परंपरागत शिक्षणाची चौकट मोडून काढल्यामुळे प्राध्यापकांना संशोधनासाठी नवीन पद्धतीवर अवलंबून राहावे लागत आहे व नवीन तंत्रज्ञानाचा त्यांना महाविद्यालयासाठी स्वीकार करावा लागेल. त्यासाठी प्राध्यापकांना संशोधनासाठी ग्रंथालयाची भूमिका ही फार महत्त्वाची आहे. अध्यापकांनी त्यांच्या संशोधनासाठी ग्रंथालयातील वाचन साहित्याचा परिपूर्ण लाभ घेतला तर ते त्यांच्या संशोधन विषयांमध्ये सक्षम होतील व त्यांचे संशोधन कार्य सुद्धा व्यवस्थित चालू राहील त्यासाठी ग्रंथालय सुसज्ज व माहितीच्या साधनाने परिपूर्ण असतील हे पहावे लागेल व त्यात ग्रंथपाल व ग्रंथालय यांची मोलाची भूमिका ठरू शकते.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

01) ग्रंथालयातील प्राध्यापकांच्या संशोधक सद्यस्थितीचा आढावा घेणे.
02) करत असलेल्या संशोधन कार्याची ग्रंथालयातील माहिती घेणे
03) संशोधक प्राध्यापक ग्रंथालयाचा वापर किती प्रमाणात करतो याची माहिती घेणे व त्याचे मूल्यमापन करणे
04) प्राध्यापक ज्या विषयावर संशोधन करत आहे त्यात वृद्धी व्हावी म्हणून ग्रंथालयाद्वारे देण्यात येणाऱ्या विविध सेवा व उपक्रमाची माहिती घेणे.
05) संशोधक प्राध्यापकांच्या कार्यात ग्रंथालयाचे योगदान व कमकुवत बाजू यावर शिफारसी सुचविणे.

**संशोधनात्मक ग्रंथालये : काळाची गरज:**

संशोधनात्मक ग्रंथालय हे केवळ ग्रंथांचा संग्रह करणारी वास्तू नसून ते एक ज्ञानाचा जिवंत झरा आहे. संशोधनात्मक ग्रंथालय म्हणजे माहितीचा प्रवास, तिच्या मूळ स्रोतापासून अंतिम उपयोगकर्त्यांपर्यंत त्वरेने आणि सहजगत्या होण्याकरिता कार्यरत असलेली एक सक्षम आणि सुसज्ज अशी ज्ञान यंत्रणा होय.

परिचयात्मक, वर्णनात्मक, निदानात्मक आणि प्रायोगिक असे संशोधनाचे चार प्रधान हेतू सांगितले जातात. तर मूलभूत, उपयोजित आणि क्रियात्मक हे संशोधनाचे तीन मुख्य व्यवहारोपयोगी प्रकार मानले गेले आहेत.

कोणत्याही देशाच्या प्रगतीची गती ही त्या देशातील शिक्षणप्रणाली आणि संशोधन कार्यक्रमांच्या विकासाच्या गतीवर अवलंबून असते. संशोधन हे एक सुसंघटित स्वरूपाचे पद्धतशीररीत्या करावयाचे अभ्यासकार्य असून नवनिर्मितीचे एक महत्त्वाचे साधन आहे.

आज जगभर संशोधन कार्यक्रमांची, संशोधकांची आणि संशोधन संस्थांची संख्या निरंतर वाढत असून त्यासाठी प्रत्येक देशाचे शासन अधिकाधिक निधी उपलब्ध करवून देत आहे. रिलायन्स इंडस्ट्रीजसारखे काही खाजगी उद्योगसमूहही या बाबतीत अग्रेसर असून त्यांनी स्वतंत्र संशोधन संस्था स्थापन केल्या आहेत. संशोधन संस्थांशिवाय महाविद्यालये आणि विद्यापीठांमधूनसुद्धा संशोधनावर आधारित

अभ्यासक्रमांवर भर दिला जात असून अशा संशोधन अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या निरंतर वाढतच आहे.

आज जगाच्या उंबरठ्यावर नव्याने उभ्या ठाकलेल्या कागदरहित युगात तर डिजिटल ग्रंथालय, ई-ग्रंथालय आणि व्हर्च्युअल ग्रंथालय या संकल्पनांची जोड पारंपरिक ग्रंथालयांना देणे अत्यावश्यक झाले आहे. सार्वजनिक ग्रंथालय, शैक्षणिक ग्रंथालय, राष्ट्रीय ग्रंथालय आदी ग्रंथालयांचे विविध प्रकार असून संशोधनात्मक ग्रंथालय हे एक विशेष स्वरूपाचे ग्रंथालय मानले जाते. संशोधन संस्थांमधील विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधक, तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ हे येथील माहितीचे उपयोगकर्ते आणि निर्माते असतात. त्यांच्या विशिष्ट स्वरूपाच्या ज्ञान-गरजा ध्यानी ठेवून संशोधनात्मक ग्रंथालयांच्या सेवांची योजना, आखणी आणि अंमलबजावणी केली जाते. विशिष्ट विषयामध्ये स्वत:ला अद्ययावत ठेवणे हे प्रत्येक प्राध्यापक संशोधकाचे आद्यकर्तव्य असून त्यामुळे त्याला स्वत:ला जगाबरोबर ठेवता येते. शिवाय त्यामुळे प्रयोगशील राहता येते. प्राध्यापक संशोधनाच्या नवीन संकल्पना सुचवतात.

**संशोधनात्मक ग्रंथालयांमधील ज्ञान साधने :**

मानव्य विद्या, समाज शास्त्रे, विज्ञान तंत्रज्ञान, कायदा अशा सर्वच क्षेत्रांमध्ये जगभर संशोधनाच्या माध्यमातून इतक्या प्रचंड प्रमाणात माहितीचा ओघ वाढतो आहे की, या ज्ञान-संचयाचे वर्णन ‘माहितीचा परिस्फोट’ अशा शब्दांत केले जाते. जगभर विविध माध्यमांमधून या ज्ञानरूपी माहितीचे नियमितपणे संकलन व प्रसारण होत असते. या माध्यमांचे प्राथमिक प्रलेख, द्वितीयक प्रलेख आणि तृतीयक प्रलेख असे ढोबळमानाने वर्गीकरण करता येते.

प्राथमिक प्रलेखांमध्ये हस्तलिखिते, पत्रव्यवहार, अहवाल, शासकीय प्रकाशने, नियतकालिकांतील लेख, शोधनिबंध, प्रबंधिका, प्रबंध, मोनोग्राफ्स, स्टँडर्डस्, पेटेंटन्स आदी साहित्याचा समावेश होतो. यामधील माहिती ही संशोधनास अतिशय आवश्यक अशी असते. द्वितीयक आणि तृतीयक प्रलेख हे प्राथमिक प्रलेखांतील माहितीच्या आधारे निर्माण होत असतात. विविध स्वरूपात विखुरलेल्या प्राथमिक प्रलेखातील माहिती संशोधकाला सहजगत्या संकलित करता यावी हा द्वितीयक आणि तृतीयक प्रलेखामागील मूळ हेतू असतो. नियतकालिकांतील लेख, ब्रिटिश सरकारचा पत्रव्यवहार, न्यायालयीन कागदपत्रे, शासकीय नोंदी, सरकारी गॅझेटच्या प्रती, तसेच या विषयावरील अशा सर्व साहित्याची जर एकत्रित यादी उपलब्ध होऊ शकली तर त्या संशोधकाला ती एक पर्वणीच ठरेल. कारण त्यामुळे प्राध्यापकाला आपले संशोधन कार्य नव्या जोमाने चालू करता येईल.आपल्या संस्थेमध्ये ज्या विषयांवर संशोधन चालते ते विशिष्ट विषय आणि त्यांच्या उपविषयांवरील ज्ञान साधनांचा येथे एक बहुआयामी ज्ञान खजिनाच उपलब्ध असतो. अशा ग्रंथालयातील ज्ञान साहित्य तीन गटांत विभागता येते. सर्वसाधारण साहित्य, विशेष साहित्य आणि संदर्भ साहित्य. आजकाल इंटरनेटवरील ऑनलाइन ज्ञान साधनांचाही मोठ्या संख्येने समावेश केला जातो. संशोधनात्मक ग्रंथालयात ग्रंथांच्या तुलनेत नियतकालिके, ई-बुक्स, ई-जर्नल्स आणि विविध डेटाबेसेसवर अधिक खर्च केला जातो.

संदर्भ साहित्यात विविध संदर्भ-ग्रंथ तसेच दुर्मिळ ग्रंथ, हस्तलिखिते, मौल्यवान साहित्य आदींचा समावेश असतो. संदर्भ-ग्रंथ विशिष्ट माहिती मिळविण्यासाठी वारंवार मागितले जातात.

उपलब्ध ज्ञानसंग्रह आणि प्राध्यापक संशोधक यांना एकत्र आणण्याचे कौशल्यपूर्ण कार्य येथील ग्रंथपाल वर्ग करीत असतो. ज्ञानसंग्रहाची उपयुक्तता आणि उपयोग वाढविण्याची जबाबदारी त्यांच्यावर असते. विशिष्ट विषय आणि त्याच्या उपशाखांशी निगडित साहित्य संकलित करणे, त्यांचे योग्य प्रकारे वर्गीकरण, तालिकीकरण करून ते उपयोगासाठी सिद्ध करणे, साहित्याचे जतन करणे, तसेच संशोधकांसाठी अद्ययावत माहिती सेवा, निवडक- माहिती प्रसारण, प्रलेख आदान-प्रदान सेवा, निर्देश आणि लेखांश सेवा, संदर्भ सेवा, अनुवाद सेवा, प्रतिलिपी सेवा अशा विशेष सेवांचे आयोजन येथे केले जाते.

संशोधनात्मक ग्रंथालयात संशोधकांच्या दृष्टिकोनातून सूक्ष्म आणि सखोल वर्गीकरण करणे आवश्यक असते. विश्लेषणात्मक वर्गीकरणाद्वारे एरवी दुर्लक्षिली जाऊ शकणारी ग्रंथांमधील महत्त्वपूर्ण प्रकरणे प्राध्यापक संशोधकांच्या नजरेस आणता येतात. नव्या विषयांचा समावेश करता येण्यासाठी वर्गीकरण पद्धतीमध्ये योग्य समावेशक चिन्हांकनाची सोय असणेदेखील महत्त्वाचे आहे. संशोधनात्मक ग्रंथालयांमध्ये वर्गीकरणाप्रमाणे तालिकीकरणदेखील सूक्ष्म आणि सखोल पद्धतीने केले जाते. काही ग्रंथांना लाभलेल्या वैशिष्ट्यपूर्ण प्रस्तावनांची दखलदेखील तालिकेमध्ये घेता येते. संशोधनात्मक ग्रंथालयांना धन, वेळ, जागा आणि श्रम यांच्यामध्ये मोठी बचत साधणे शक्य झाले आहे.

काही संशोधनात्मक ग्रंथालयांतून स्वतंत्र माहिती व प्रलेखन विभाग कार्यरत असून त्याद्वारे संशोधकांना त्यांच्या विषयावरील अद्ययावत माहिती निरंतर मिळत राहील याची दक्षता घेतली जाते. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळ्यांवरदेखील अशी माहिती व प्रलेखन केंद्रे अस्तित्वात आली असून त्यांच्या सेवांचा लाभ प्राध्यापक संशोधकांना स्वतंत्ररीत्या घेता येतो.

कोणतेही ग्रंथालय ज्ञानसाधनांच्या बाबतीत कधीही स्वयंपूर्ण होऊ शकत नाही. हे वास्तव लक्षात ठेवून इतर ग्रंथालयांशी सौहार्दपूर्ण संबंध प्रस्थापित करून आपल्या ग्रंथालयातील वाचन साहित्य व सेवा तेथील प्राध्यापक संशोधकांना उपलब्ध करून दिल्यास आपल्या संशोधकांना कधी एखादे साहित्य तातडीने हवे असेल तर त्यांच्याकडून ते विनासायास मिळविता येऊ शकते.

**समारोप:**

संशोधनात्मक ग्रंथालय हे केवळ ग्रंथांचा संग्रह करणारी वास्तू नसून ते एक ज्ञानाचा एक जिवंत झरा असते. संशोधनामध्ये प्राध्यापकांना लागणाऱ्या विशिष्ट विषयावरील अद्ययावत ज्ञानसाधने असणारे ते एक माहिती केंद्र असते. प्राध्यापक संशोधकांना लागणाऱ्या विशिष्ट विषयावरील माहितीचे स्वरूप जाणून घेऊन त्याप्रमाणे येथे ग्रंथालयप्रणाली तसेच द्यावयाच्या सेवा आणि कार्यपद्धतींची आखणी केली जाते. प्राध्यापकांच्या संशोधनात्मक कार्यासाठी ग्रंथालय म्हणजे माहितीचा प्रवास, तिच्या मूळ स्रोतापासून अंतिम उपयोगकर्त्यांपर्यंत त्वरेने आणि सहजगत्या होण्याकरिता कार्यरत असलेली एक सक्षम आणि सुसज्ज अशी ज्ञान यंत्रणा होय. देशाच्या विकास आणि प्रगती कार्यक्रमांमध्ये संशोधनात्मक ग्रंथालयांचे फार मोठें योगदान आहे, असे म्हटल्यास ती अतिशयोक्ती ठरू नये.

**References:**

1) किनगे, मुक्ता गोपाळ (2019-20) अंबाजोगाई येथील महाविद्यालयीन

प्राध्यापकांच्या संशोधन कार्याचा आढावा केंद्र परभणी, य.च.म.मु.वि. नाशिक.

2) फडके, द.ना. (2009) ग्रंथालयात 2.0 तंत्रज्ञानाचा वापर. ज्ञानगंगोत्री, 24.
3) रिसवडकर म.रा. (2009), ग्रंथालय आणि माहितीशास्त्राची संशोधन पद्धती, पुस्तक 01, य.च.म.मु.वि.,नाशिक.
4) The Shorter Oxford English Dictionary on Historical Principles, Oxford, 1985, p. 1804
5) The Advanced Learner's Dictionary of Current English. Oxford, 1952 p. 1069
6) Hase, V. L., & Gaikwad, M. N. (2021). Online Databases Backbone for Teaching and Research: Case Study of Rajarambapu Institute of Technology, affiliated to Shivaji University, Kolhapur, Maharashtra (India).
7) http://repository.kln.ac.lk/handle/123456789/17986
8) http://www.knowledgecommission.gov.in
9) Wedgeworth, R. (ed): World Encyclopedia of Library and Information Sciences. 3rd ed. - Chicago: American Library Association, 1993, p. 785.